**वेदांता लिमिटेड**

**शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) योग्य पद्धतीने भौतिक घटनांचा / अप्रकाशित किंमतीशी संबंधित संवेदनशील माहितीचा खुलासा करण्यासाठी भौतिकता आणि अभिलेखीय धोरण निश्चित करण्यासाठी धोरण**

| | |
|---|---|
| **मंजूर केले आहे** | संचालक मंडळाने |
| **आवृत्ती:** | 03 |
| **प्रभावी दिनांक** | 06 ऑगस्ट 2024 |

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ए. | धोरणाचे उद्दिष्ट | 03 |
| बी. | स्पष्टीकरण | 03 |
| सी. | सतत खुलासा करण्याची बांधिलकी | 03 |
| डी. | भौतिकता मूल्यमापन आणि खुलासा करण्यासाठीच्या गरजा | 04 |
| इ. | माहितीचा खुलासा करण्याची कालमर्यादा | 05 |
| एफ. | भौतिकता निश्चित करण्याचे आणि त्याअंतर्गत माहितीचा प्रसार करण्याचे अधिकार | 06 |
| जी. | विश्लेषक आणि गुंतवणूकदार यांची बैठक | 07 |
| एच. | अनपेक्षित किंवा नकळत खुलासे | 07 |
| आय. | अभिलेखीय धोरण | 07 |
| जे. | मर्यादा आणि सुधारणा | 07 |
| | **परिशिष्टांची यादी** | |
| | परिशिष्ट 1 - भौतिक किंमतीची हालचाल (**"एम.पी.एम"**) | 08 |
| | परिशिष्ट २ - मुख्य प्रवाहातील माध्यमे - व्याप्ती आणि कार्यक्षेत्र | 09 |

**शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) योग्य पद्धतीने भौतिक घटनांचा / अप्रकाशित किंमतीशी संबंधित संवेदनशील माहितीचा खुलासा करण्यासाठी भौतिकता व अभिलेखीय धोरण निश्चित करण्यासाठी धोरण**

## ए. धोरणाचे उद्दिष्ट

सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ("**सेबी**") (सूचीबद्ध करण्याच्या (लिस्टिंगच्या) जबाबदाऱ्या आणि खुलासा करण्याच्या गरजा) नियम, 2015 ("**सूचीबद्ध करण्याचे (लिस्टिंगचे) विनियम**") ने एखाद्या घटनेची / माहितीची भौतिकता निश्चित करण्यासाठी आणि भौतिक घटना व अप्रकाशित किंमतीशी संबंधित संवेदनशील माहिती ("**यूपीएसआय**") चा निष्पक्ष खुलासा शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) करण्यासाठीच्या कार्यपद्धती आणि अभिलेखीय धोरण निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे विहित केले आहे.

एक जागतिक संस्था म्हणून, आंतरराष्ट्रीय मानके आणि सर्वोत्तम पद्धती यांनी वेदांता लिमिटेड ("**कंपनी**") च्या कॉर्पोरेट गव्हर्नन्स पद्धतींना मापदंड लावण्यात आलेले असते (कॉर्पोरेट गव्हर्नन्स पद्धती बेंचमार्क केल्या जातात). निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेवर भौतिक माहिती प्रसारित करण्यासाठी कंपनी आपल्या गुंतवणूकदारांप्रती आपली जबाबदारी ओळखते. त्यानुसार, कंपनी या धोरणाद्वारे भौतिकता आणि त्यांचा योग्य खुलासा करणे निश्चित करण्यासाठीचे निकष निर्धारित करत आहे.

कंपनीने प्रसारित केलेल्या माहितीच्या गुणवत्तेला व अखंडतेला समर्थन देणारी आणि विश्वास वाढविणारी एक चौकट प्रदान करणे, हे या धोरणाचे उद्दीष्ट आहे.

हे धोरण सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या) तरतुदींनुसार उल्लेखित कोणतीही गरज कमी करणार नाही. हे धोरण सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या) संदर्भात कोणतीही संभाव्य घटना किंवा माहिती ओळखण्यास आणि अधिकृत कर्मचाऱ्यांना ती कळविण्यास कंपनीच्या "संबंधित कर्मचाऱ्यांना" मदत करेल जेणेकरून शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) आवश्यक खुलासे करता येतील.

## बी. स्पष्टीकरण

या धोरणात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा आणि अभिव्यक्तींचा अर्थ हा सूचीबद्ध करण्याच्या विनियमांमध्ये अंतर्भूत केल्याप्रमाणेच, आणि किंवा इतर लागू कायदे व त्याअंतर्गत केलेल्या सुधारणा यांच्याप्रमाणेच आहे.

## सी. सतत खुलासा करण्याची बांधिलकी

सूचीबद्ध करण्याच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्स) अंतर्गत उल्लेखित कालमर्यादेत भौतिक घटना व माहिती यांचा खुलासा करण्यास कंपनी पूर्णपणे बांधील आहे. हे धोरण संपूर्ण संस्थेत पूर्णपणे स्वीकारले गेले आहे याची खात्री करण्यासाठी, कंपनीने खालील गोष्टींचा तपशील देणारी अंतर्गत एस.ओ.पी विकसित केली आहे:

- वैधानिक आवश्यकतांची माहिती देणारी प्रमुख तत्त्वे;
- शेअर बाजाराला कळविण्याची गरज असलेल्या कोणत्याही संभाव्य भौतिक घटना किंवा माहिती ओळखण्यासाठी जबाबदार असतील असे कंपनीचे "संबंधित कर्मचारी".
- संपूर्ण संस्थेत पाळल्या जाणाऱ्या कळविण्याच्या (रिपोर्टिंग) कार्यपद्धती
- अंतर्गत संप्रेषण आणि संवेदीकरण
- परिणाम व्यवस्थापन

एस.ओ.पी मध्ये उल्लेखित असल्याप्रमाणे संचालक, मुख्य व्यवस्थापकीय कर्मचारी ("**के.एम.पी**") आणि संबंधित कर्मचारी, कंपनी खुलासा करण्याच्या दायित्वांचे पालन करत आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार असतील आणि प्रामुख्याने खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित करून हे केले गेले पाहिजे:

- खुलासा करण्यायोग्य माहिती ओळखण्यासाठी पुरेशी प्रक्रिया आणि नियंत्रणे आहेत याची खात्री करणे
- एखादी घटना प्रत्यक्ष घडण्याच्या वेळेच्या किंवा माहितीच्या मूल्यमापनाच्या आधारे शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) खुलासे कोणत्या वेळी करायचे आहेत हे निश्चित करून आणि विहित कालमर्यादेत खुलासे प्रसारित केले जात आहेत याची खात्री करणे
- सेबी सूचीबद्ध करण्यात (लिस्टिंग रेग्युलेशन्समध्ये) स्पष्टपणे व्याख्या केल्या नसलेल्या अशा इतर घटनांचा किंवा माहितीचा विचार करणे ज्यांची शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) खुलासा करण्याची गरज असू शकते आणि अशा बाबींची खुलासा करण्याची भौतिकता, योग्य वेळ आणि आशय निश्चित करणे
- संपूर्ण संस्थेत अंतर्गत एस.ओ.पी चे पालन अक्षरशः आणि चांगल्या अर्थाने केले जात असल्याची खात्री करणे

वर दिलेल्या गोष्टींव्यतिरिक्त, सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन) 30 (11 ए) अनुसार, कंपनीचे प्रवर्तक, संचालक, के.एम.पी किंवा वरिष्ठ व्यवस्थापन मंडळ हे उपस्थित केलेल्या प्रश्नांना किंवा कंपनीने मागवलेल्या स्पष्टीकरणास पुरेसे, अचूक आणि वेळेवर उत्तर देतील जेणेकरून सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन) 30(11) अंतर्गत आवश्यकतांचे पालन सुनिश्चित करता येईल आणि कंपनी अशा व्यक्तीकडून (व्यक्तींकडून) प्राप्त प्रतिसाद शेअर बाजारात (स्टॉक एक्स्चेंजमध्ये) त्वरित प्रसारित करेल.

व्यवहारात कंपनीचा प्रवर्तक सहभागी असेल, तर अशा विशिष्ट परिस्थितीत, कंपनीला बाजारातील अफवेसंदर्भात प्रवर्तकाकडे चौकशी करणे बंधनकारक असेल. प्रवर्तकाकडून प्राप्त /अनुपस्थित माहितीचा खुलासा (कंपनीच्या विनंतीनुसार) कंपनीद्वारे करण्यात येईल. हे स्पष्ट केले जात आहे की स्पष्टीकरण मागण्यासाठी कंपनीवर उपरोक्त आवश्यकता कंपनीच्या प्रवर्तकाशी संबंधित व्यवहाराशी संबंधित अफवेपुरती मर्यादित असणार आणि इतर कोणत्याही तृतीय पक्ष किंवा सार्वजनिक भागधारकापुरते असणार नाही.

## डी. भौतिकता मूल्यमापन आणि खुलासा करण्याच्या गरजा

1. घटना किंवा माहितीशी संबंधित वस्तुस्थिती आणि परिस्थितीवर अवलंबून राहून भौतिकता प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर निश्चित केली जाईल.
2. भौतिकतेचा विचार न करता सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या अनुसूची III च्या भाग ए मधील (ए) मध्ये उल्लेखित घटनांचा खुलासा केला जाणार आहे.
3. भौतिकतेसाठी मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीनंतर सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या अनुसूची III च्या भाग ए मधील (ए) मध्ये उल्लेखित घटनांचा खुलासा केला जाणार आहे.
4. सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या अनुसूची III च्या भाग बी मध्ये उल्लेखित सर्व माहितीचा खुलासा केला जाणार आहे जी वेदांता लिमिटेडच्या कामगिरीवर / कार्य करण्यावर परिणाम करेल किंवा किंमतच्या बाबतीत संवेदनशील आहे किंवा व्याज किंवा लाभांश देण्यावर किंवा नॉन-कन्व्हर्टिबल सिक्युरिटीजच्या रिडेम्प्शन पेमेंटवर परिणाम करणार आहे.

5. वरील मुद्दा 2 द्वारे समाविष्ट केलेल्या घटनेची (घटनांची) / माहितीची भौतिकता निश्चित करण्यासाठी कंपनी खालील मार्गदर्शक तत्त्वे लागू करेल:

प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर माहितीशी / घटनेशी संबंधित विशिष्ट वस्तुस्थितींनुसार आणि परिस्थितींनुसार भौतिकता निश्चित केली जाणार आहे. एखादी विशिष्ट घटना / माहिती भौतिक स्वरूपाची आहे की नाही, हे निर्धारित करण्यासाठी, कंपनी खालील निकषांचा विचार करेल:

1. अशी एखादी घटना किंवा माहिती वगळणे:
   (ए) ज्यामुळे एखाद्या घटनेत किंवा आधीच सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये विसंगती किंवा बदल होण्याची शक्यता असते; किंवा
   (बी) ज्यामुळे असे वगळणे नंतर उघडकीस आल्यास बाजारात लक्षणीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता असते; किंवा
   (सी) ज्याचे मूल्य किंवा मूल्याच्या दृष्टीने अपेक्षित प्रभाव, खालीलपैकी कमी असलेल्याच्या पलीकडे जाते:
   - उलाढालीच्या 2%, जे कंपनीच्या शेवटच्या लेखापरीक्षण केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणानुसा आहे;
   - निव्वळ संपत्तीच्या 2%, जे कंपनीच्या मागील लेखापरीक्षण केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणानुसार आहे, पण निव्वळ संपत्तीचे गणितीय मूल्य नकारात्मक असल्यास वगळले गेले आहे;
   - करोत्तर नफा किंवा तोट्याच्या निरपेक्ष मूल्याच्या सरासरीच्या 5%, जे कंपनीच्या मागील तीन लेखापरीक्षण केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणानुसार आहे.

2. वरील (ए), (बी) आणि (सी) मध्ये उल्लेखित निकष लागू नसलेल्या स्थितीत, कंपनीच्या संचालक मंडळाच्या मते किंवा संचालक मंडळाने अधिकृत केलेल्या के.एम.पी च्या मते, घटना / माहिती भौतिक स्वरूपाची मानली जाते.

6. सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या) अनुसूची III सहपठीत विनियम 30 अन्वये किंवा सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन्स) 51 अंतर्गत उल्लेखित सर्व घटना किंवा माहिती कंपनी शेअर बाजाराला (स्टॉक एक्स्चेंजला) त्वरित कळवेल.

7. कंपनीसाठी भौतिक स्वरूपाच्या उपकंपन्यांशी संबंधित सर्व घटनांचा किंवा माहितीचा सुद्धा खुलासा कंपनी करणार आहे.

8. या विनियमातील तरतुदींनुसार सूचीबद्ध संस्थेने एखाद्या घटनेचा किंवा माहितीचा खुलासा करणे आवश्यक असल्यास, कोणत्याही नियामक, वैधानिक, अंमलबजावणी किंवा न्यायालयीन प्राधिकरण यांच्याकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर, अशा प्राधिकरणाद्वारे अशा संप्रेषणाचा खुलासा करण्यास मनाई केली नसल्यास, कंपनी घटना किंवा माहिती यांच्यासह अशा संप्रेषणाचा खुलासा करेल.

9. 01 जून 2024 पासून कंपनी, ***भौतिक किंमतीची हालचाल ("एम.पी.एम")*** (*या धोरणाच्या **परिशिष्ट I** मध्ये तपशीलवार दिलेली चौकट*), ***मुख्य प्रवाहातील माध्यमांमधील*** कोणत्याही कळविलेल्या घटनेवर किंवा माहितीवर (*या धोरणाच्या परिशिष्ट II मध्ये तपशीलवार दिलेली व्याप्ती आणि कार्यक्षेत्र*) पुष्टी करेल, नाकारेल किंवा स्पष्ट करेल, जी सामान्य स्वरूपाचे नसेल आणि जी सूचित करते की ओढवलेल्या विशिष्ट घटनेची किंवा माहितीची अफवा गुंतवणूक करणाऱ्या जनतेत फिरत आहे, आणि हे शक्य तितक्या लवकर करायचे आहे पण कोणत्याही परिस्थितीत एम.पी.एम ची सुरुवात झाल्यापासून (ट्रिगरपासून) चोवीस (24) तासांच्या आतच करायचे आहे.

कंपनीने जर कळविलेल्या घटनेची किंवा माहितीची पुष्टी केली, तर ती अशा घटनेचा सध्याचा टप्पा किंवा

माहिती सुद्धा कंपनी प्रदान करेल.

परंतु असे की जेव्हा कंपनी भौतिक किंमतीच्या हालचालीची सुरुवात झाल्यापासून (ट्रिगरपासून) चोवीस तासांच्या आत कोणतीही नोंदवलेल्या घटनेची किंवा माहितीची पुष्टी करते ज्यावर सेबी (भांडवल आणि खुलासा करण्याच्या आवश्यकता जारी करणे) विनियम, 2018 च्या अध्याय V किंवा अध्याय VI अंतर्गत प्रदान केलेले मूल्य निर्धारण निकष किंवा सेबी (शेअर्सचे लक्षणीय प्रमाणात अधिग्रहण आणि व्यवहार हाती घेणे) विनियम, 2011 च्या विनियमन 8 किंवा विनियम 9 अंतर्गत प्रदान केलेले मूल्य निर्धारण निकष किंवा सेबी (सिक्युरिटीजची बाय-बॅक) विनियम, 2018 च्या विनियम 19 किंवा विनियम 22बी अंतर्गत प्रदान केलेले मूल्य निर्धारण निकष किंवा सेबी किंवा शेअर बाजाराने (स्टॉक एक्स्चेंज ने) उल्लेखित इतर कोणतेही मूल्य निर्धारण निकष लागू आहेत, तेव्हा चौकटीप्रमाणे सेबी ने उल्लेख केल्याप्रमाणे भौतिक किंमतीच्या हालचालीमुळे आणि कळविलेल्या घटनेच्या किंवा माहितीच्या पुष्टीमुळे कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या किंमतीवर होणारा परिणाम त्या व्यवहाराची किंमत मोजण्यासाठी वगळला जाऊ शकतो.

बाजारातील अफवेची पुष्टी झाल्यानंतर व्यवहारांसाठी घ्यावयाच्या अप्रभावित किंमतीसाठी **अप्रभावित किंमत चौकटीचा** विचार केला जाईल. ही चौकट वेळोवेळी बदल केलेल्या सेबीच्या दिनांक 21 मे 2024 रोजीच्या परिपत्रक क्र.सेबी/ एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-2/पी/सीआयआर/2024/51 अनुसार असेल.

10. सेबी ने वेळोवेळी सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन) अंतर्गत विहित केल्यानुसार खुलासा करण्याचे स्वरूप असेल.

## इ. माहितीचा खुलासा करण्याची कालमर्यादा

कंपनी खाली दिलेल्या कालमर्यादेनुसार सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्स) अंतर्गत आवश्यक असलेल्या सर्व भौतिक घटनांचा / माहितीचा आणि अशा इतर फाइलिंगचा खुलासा करेल:

| माहितीचे स्वरूप | खुलासा करण्याची कालमर्यादा |
|---|---|
| **वेदांता लिमिटेडमध्ये घडणाऱ्या घडामोडी किंवा माहिती** *यांच्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल:*<br>• *कोणतीही अंतर्गत घटना / माहिती जी भौतिक स्वरूपाची मानली जाण्याची शक्यता आहे.*<br>• *वेदांता लिमिटेडसह तिच्या उपकंपन्यांवर भौतिकदृष्ट्या परिणाम करणारी कोणतीही बाह्य घटना / माहिती आणि ती औपचारिकरित्या वेदांताला कळविली गेली असेल तर.* | • **मंडळाच्या मंजुरीची आवश्यकता असलेल्या घटना / माहिती :**<br>संचालक मंडळाची बैठक संपल्यानंतर 30 मिनिटांच्या आत ज्या विषयाला मंजुरी दिली गेली आहे<br>• **अशा घटना / माहिती ज्यात बोर्डाच्या मंजुरीची गरज नाही:**<br>12 तासात |
| **वेदांता लिमिटेडच्या बाहेर उद्भवणारी माहिती जी तृतीय पक्षाद्वारे सूचित केली जाते** *यात पुढील गोष्टींचा समावेश असेल:*<br>• *वेदांता लिमिटेडसह त्याच्या उपकंपन्यांवर भौतिक परिणाम करणारी कोणतीही बाह्य घटना / माहिती आणि ती औपचारिकरित्या वेदांतला कळविली गेली नसेल तर.* | 24 तासात |

| | |
|---|---|
| **अनुसूची III मध्ये उल्लेखित बाबींसाठी संचालक मंडळाच्या बैठकीचा निकाल** | संचालक मंडळाची बैठक संपल्यानंतर 30 मिनिटांच्या आत |
| **विश्लेषक किंवा संस्थात्मक गुंतवणूकदार यांच्या बैठकीचे वेळापत्रक** | कमीत कमी 2 कार्यदिवस अगोदर (सूचना देण्याची तारीख आणि बैठकीची तारीख वगळून) |
| **विश्लेषक / गुंतवणूकदार बैठकीचे सादरीकरण आणि ऑडिओ / व्हिडिओ रेकॉर्डिंग** | पुढील ट्रेडिंग दिवसापूर्वी किंवा असे कॉल्स संपल्यावर 24 तासांच्या आत, जे आधी असेल ते |
| **विश्लेषक/ गुंतवणूकदार मेळाव्याचे अनुलेख (ट्रान्सस्क्रिप्ट)** | असा कॉल संपल्यानंतर 5 कार्यदिवसांच्या आत |
| **सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या) अनुसूची III च्या भाग ए मधील परिच्छेद ए च्या कलम 5ए मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कंपनीवर बंधनकारक करार** | **<u>भविष्यातील कोणताही करार जिथे वेदांता लिमिटेड करारांमध्ये पक्ष नाही:</u>**<br>सर्व भागधारक, प्रवर्तक, प्रवर्तक गट संस्था, संबंधित पक्षकार, संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी आणि कंपनीचे कर्मचारी किंवा कंपनीचे होल्डिंग, सहाय्यक आणि सहयोगी कंपनी, जे करारांचे पक्षकार आहेत, त्यांनी असे करार केल्यानंतर किंवा अशा करारांवर स्वाक्षरी केल्यानंतर **2 कार्यदिवसांच्या आत ज्या <u>करारात कंपनी पक्ष नाही</u>** त्या कराराबद्दल कंपनीला माहिती देतील.<br>त्यानंतर ही माहिती मिळाल्यावर 24 तासांच्या आत कंपनी शेअर बाजाराला (बाजारांना) (स्टॉक एक्स्चेंजेसना) कळवेल.<br><br>**<u>कोणताही भविष्यातील करार जिथे वेदांता लिमिटेड करारांचा एक पक्ष आहे:</u>**<br>• **मंडळाच्या मान्यतेनंतरचे करार :**<br>संचालक मंडळाची बैठक संपल्यानंतर 30 मिनिटांच्या आत ज्यामध्ये करार मंजूर केला गेला आहे<br>• **बोर्डाच्या मंजुरीची आवश्यकता नसलेल्या घटना / माहिती:**<br>असे करार केल्यानंतर किंवा असे करार करण्यासाठी करारावर स्वाक्षरी केल्यानंतर 12 तासांच्या आत |

## एफ. भौतिकता निश्चित करण्याचे आणि त्याअंतर्गत माहितीचा प्रसार करण्याचे अधिकार

सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन) 30 अंतर्गत विहित केल्याप्रमाणे, कंपनीच्या संचालक मंडळाने एखाद्या घटनेची किंवा माहितीची भौतिकता निश्चित करण्याच्या उद्देशाने आणि स्टॉक एक्स्चेंजला खुलासा करण्याच्या उद्देशाने खालील प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना अधिकृत केले आहे:

1. **<u>घटनेची भौतिकता निश्चित करणे</u>**: ग्रुप कम्युनिकेशन्स अँड इन्व्हेस्टर रिलेशन्स च्या प्रमुखांशी सल्लामसलत करून कार्यकारी संचालक आणि केएमपी (सीईओ, सीएफओ आणि सीएस) यांना शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंज कडे) खुलासा करण्याच्या हेतूने एखाद्या घटनेची / माहितीची भौतिकता निश्चित करण्यासाठी संयुक्तपणे अधिकृत (अधिकृत कर्मचारी) करण्यात आलेले आहे.

   घटना किंवा माहिती यांचा खुलासा करण्याबाबत कंपनीच्या अंतर्गत एस.ओ.पी मध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे 'संबंधित कर्मचारी' शेअर बाजाराला (स्टॉक एक्स्चेंजला) कळविण्याची गरज असलेली कोणतीही घटना किंवा माहिती तत्काळ वरील अधिकृत कर्मचाऱ्यांना कळवितील.

2. **<u>शेअर बाजाराकडे (बाजरांकडे) (स्टॉक एक्स्चेंज (एक्स्चेंजेसकडे) खुलासा करणे</u>**: कंपनीचे_कंपनी सचिव / अनुपालन अधिकारी / उप कंपनी सचिव यांना शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) माहितीचा प्रसार करण्याचे आणि भौतिक स्वरूपाच्या घटना / माहिती यांचा खुलासा करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

## जी. विश्लेषक आणि गुंतवणूकदार यांची बैठक

कंपनी कालवेळी विविध विश्लेषक आणि गुंतवणूकदार बैठकांमध्ये भाग घेते. अशा बैठकांमध्ये, कंपनी खालील गोष्टींची खात्री करेल:

1. शेअर बाजाराकडे (बाजारांकडे) (स्टॉक एक्स्चेंज (एक्स्चेंजेसकडे) त्याच वेळी जाहीर केल्याशिवाय या बैठकांमध्ये बाजाराविषयीची संवेदनशील माहिती जाहीर केली जाणार नाही;
2. जर बाजाराची संवेदनशील माहिती नकळतपणे जारी केली गेली तर ती शक्य तितक्या लवकर शेअर बाजाराकडे (स्टॉक एक्स्चेंजकडे) जारी केली जाईल परंतु सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्स) अंतर्गत उल्लेख केलेल्या कालमर्यादेच्या आत राहून तसे केले जाणार आहे;
3. बाजारातील संवेदनशील माहितीशी निगडित असलेल्या प्रश्नांची उत्तरे व्यवस्थापन मंडळाकडून दिली जाणार नाहीत; आणि
4. गुंतवणूकदारांचे सादरीकरण कंपनीच्या वेबसाइटवर सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## एच. अनपेक्षित किंवा नकळतपणे केलेले खुलासे

कंपनी भागधारकांना अत्यंत सावधगिरीने कोणताही खुलासा करणार आहे. तथापि, कंपनीच्या प्रवक्त्याने किंवा कर्मचाऱ्याने नकळतपणे अनपेक्षित खुलासा केल्यास शक्य तितक्या लवकर लक्ष्यित प्रेक्षकांना त्वरित प्रत्युत्तर दिले जाईल किंवा स्पष्टकरण दिले जाईल जेणेकरून अशा अवांछित किंवा नकळतपणे केलेल्या खुलाशांमुळे होणारा कोणताही परिणाम कमी करता येईल.

## आय. अभिलेखीय धोरण

सूचीबद्ध करण्याच्या विनियमांच्या विनियम (लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन) 30(8) अन्वये विहित केल्याप्रमाणे, कंपनी या विनियमांतर्गत शेअर बाजाराला (स्टॉक एक्स्चेंजला) खुलासा केलेल्या अशा सर्व घटना किंवा माहिती आपल्या वेबसाइटवर जाहीर करेल आणि असे खुलासा कंपनीच्या वेबसाइटवर कमीतकमी पाच वर्षांसाठी आणि त्यानंतर कंपनी सचिवांच्या स्वेच्छानिर्णयानुसार सादर केले जातील, जे सादर केलेली माहिती टिकवून ठेवण्याचा किंवा ती रद्द करण्याचा निर्णय घेऊ शकतात.

## जे. मर्यादा आणि सुधारणा

या धोरणातील तरतुदी आणि अधिनियम किंवा सूचीबद्ध विनियम किंवा इतर कोणतेही वैधानिक कायदे, नियम यांच्यात काही विरोध निर्माण झाल्यास, अशा अधिनियमातील तरतुदी किंवा सूचीबद्ध विनियम किंवा वैधानिक कायदे, नियम या धोरणावर प्रबळ राहतील. सूचीबद्ध करण्याचे विनियम, अधिनियम आणि / किंवा या संदर्भात लागू असलेले कायदे यांच्यात पुढील कोणतीही सुधारणा / बदल या धोरणास आपोआप लागू होणार आहे.

हे धोरण दिनांक 06 ऑगस्ट 2024 पासून लागू होईल. कंपनीचे संचालक मंडळ वेळोवेळी धोरणाचा आढावा घेईल आणि धोरणात वेळोवेळी सुधारणा करू शकेल जेणेकरून लागू वैधानिक तरतुदींनुसार नियामक सुधारणांशी अनुरूप होता येईल.

**<u>परिशिष्ट I</u>**

**भौतिक किंमतीची हालचाल ("एम.पी.एम")**

कंपनीकडून बाजारातील अफवा पडताळणीसंदर्भात एम.पी.एम (इक्विटी कॅश मार्केटमध्ये) वरील चौकट बीएसई लिमिटेड ("**बीएसई**") आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ("**एनएसई**") यांनी दिनांक 21 मे 2024 रोजी जारी केलेल्या परिपत्रकांनुसार असेल.

उपरोक्त परिपत्रके खालील तपशीलानुसार शेअर बाजाराच्या (स्टॉक एक्स्चेंजच्या) वेबसाइटवर पाहता येतील:

| **शेअर बाजार (स्टॉक एक्सचेंज)** | **संदर्भ क्र.** | **तारीख** | **लिंक** |
|---|---|---|---|
| बीएसई | 20240521-58 | मे 21, 2024 | बीएसई |
| एनएसई | एनएसई/सर्व्हे/62122 | मे 21, 2024 | एनएसई |

एम.पी.एम गणनेची चौकट खालीलप्रमाणे असेल:

<table>
<tr><td colspan="4">सकारात्मक बातम्या / अफवा असल्याच्या परिस्थितीत</td></tr>
<tr><td rowspan="2">सूचीबद्ध इक्विटी शेअर्सच्या किंमतीची श्रेणी</td><td colspan="3">शेअरच्या किंमतीतील टक्केवारीतील तफावत जी भौतिक किंमत मानली जाईल</td></tr>
<tr><td>सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकाची हालचाल 1%पेक्षा कमी</td><td>सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकाची हालचाल 1% पेक्षा जास्त किंवा समान</td><td>इंट्राडे किंमतीची हालचाल (म्हणजे सकाळी 9.30 नंतर)</td></tr>
<tr><td>रु. 200 आणि त्यापेक्षा जास्त</td><td>≥ 3%</td><td>बँड हिट किंवा (सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकात 3% +% बदल) पेक्षा जास्त किंवा समप्रमाण</td><td>≥ 3%</td></tr>
<tr><td colspan="4">नकारात्मक बातम्या / अफवा असल्याच्या परिस्थितीत</td></tr>
<tr><td rowspan="2">सूचीबद्ध इक्विटी शेअर्सच्या किंमतीची श्रेणी</td><td colspan="3">शेअरच्या किमतीतील टक्केवारीतील तफावत जी भौतिक किंमत मानली जाईल</td></tr>
<tr><td>सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकाची हालचाल -1% पेक्षा कमी किंवा समान</td><td>सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकाची हालचाल -1% पेक्षा जास्त</td><td>इंट्राडे किंमतीची हालचाल (म्हणजे सकाळी 9.30 नंतर)</td></tr>
<tr><td>रु. 200 आणि त्यापेक्षा जास्त</td><td>बँड हिट किंवा (सकाळी 9.30 वाजता बेंचमार्क निर्देशांकात -3% -% बदल) पेक्षा जास्त किंवा समान</td><td>≤ -3%</td><td>≤ -3%</td></tr>
</table>

**इंट्राडे किंमतीच्या हालचालीच्या (प्राइस मूव्हमेंटच्या) बाबतीत (म्हणजे सकाळी 9.30 नंतर) निर्देशांकाच्या हालचालींचा विचार न करता केवळ शेअरमधील किंमतीच्या श्रेणीवर आधारित किंमतच्या तफावतचा विचार केला पाहिजे.*

एम.पी.एम ची सुरुवात झाल्यावर (ट्रिगरवर) अफवांचा मागोवा घेण्याचा लुक-बॅक कालावधी कंपनीच्या के.एम.पी द्वारे निश्चित केल्यानुसार प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर निर्धारित केला जाईल.

**परिशिष्ट II**

**मुख्य प्रवाहातील माध्यमे - व्याप्ती आणि कार्यक्षेत्र**

मुख्य प्रवाहातील माध्यमांची व्याख्या वेळोवेळी बदल केले जाऊ शकणाऱ्या सेबीच्या दिनांक 21 मे 2024 रोजीच्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-2/पी/सीआयआर/2024/52 अन्वये जारी करण्यात आलेल्या उद्योग मानकांनुसार असेल जे बीएसई आणि एनएसई ने दिनांक 21 मे 2024 रोजी जारी केलेल्या परिपत्रकांसहपठीत असेल.

उपरोक्त परिपत्रके खालील तपशीलानुसार सेबी आणि शेअर बाजाराच्या (स्टॉक एक्स्चेंजच्या) वेबसाइटवर पाहता येतील:

| **शेअर बाजार (स्टॉक एक्सचेंज)** | **संदर्भ क्र.** | **तारीख** | **लिंक** |
|---|---|---|---|
| सेबी | सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-2/पी/सीआयआर/2024/52 | मे 21, 2024 | सेबी |
| बीएसई | 20240521-56 | मे 21, 2024 | बीएसई |
| एसएसई | एनएसई/सीएमएल/2024/13 | मे 21, 2024 | एनएसई |

मुख्य प्रवाहातील प्रसार माध्यमे उद्योग मानकांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे केवळ विशिष्ट बातम्यांचे स्त्रोत कव्हर करतील ज्यात खालील गोष्टींचा समावेश असेल:

(ए) भारतीय वृत्तपत्रे;
(बी) डिजिटल / ऑनलाइन बातम्यांचे स्त्रोत;
(सी) आंतरराष्ट्रीय प्रसार माध्यमे;
(डी) वृत्तवाहिन्या; आणि
(इ) सोशल मीडियाला वगळण्यात यावे.

आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे केवळ खालील बातम्यांचे स्त्रोत कव्हर करतील:

बाजार भांडवलीकरणावर आधारित शीर्ष 100 सूचीबद्ध कंपन्यांसाठी, संचरणानुसार शीर्ष इंग्रजी व्यवसाय / वित्तीय दैनिक, शीर्ष 5 (पाच) अधिकार क्षेत्रांमध्ये, जिथे परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतात गुंतवणूक केली आहे, शीर्ष 5 अधिकार क्षेत्रांमध्ये जे आहेत युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, सिंगापूर, मॉरिशस, लक्झमबर्ग आणि युनायटेड किंग्डम. या अधिकारक्षेत्रांसाठी सध्या शीर्ष इंग्रजी व्यवसाय / वित्तीय दैनिकांमध्ये हे खाली दिलेले सामील आहेत:

(ए) युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका साठी वॉल स्ट्रीट जर्नल आणि फायनान्शियल टाईम्स;
(बी) सिंगापूरसाठी बिझनेस टाइम्स (स्थानिक वृत्तपत्र) आणि फायनान्शियल टाइम्स; आणि
(सी) युनायटेड किंगडमसाठी फायनान्शियल टाइम्स.

मॉरिशस आणि लक्झमबर्ग मध्ये कोणतेही व्यावसायिक / वित्तीय वृत्तपत्र छापील स्वरूपात प्रकाशित होत नाही आणि म्हणून या 2 (दोन) अधिकारक्षेत्रांसाठी कोणतेही वृत्तपत्र जोडले गेलेले नाही.

भाग ए - उद्योग मानकांचे सामान्य पैलू, अंतर्गत कलम 1.1(iii)(बी) अनुसार, वर आधीच व्याख्या केलेल्या स्त्रोतांव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांची खात्री करून घेण्यासाठी, सूचीबद्ध करण्याच्या विनियमांनुसार (लिस्टिंग रेग्युलेशन्स अनुसार) भौतिक सहाय्यक कंपन्यांच्या निर्धारणासाठी पाळल्या गेलेल्या निकषांच्या आधारे भौतिक व्यवसाय प्रचालन करणाऱ्या परदेशी अधिकारक्षेत्रांची ओळख केली जाईल.

इंग्रजी व्यावसायिक / वित्तीय बातम्यांच्या स्त्रोतांची यादीचा पाठपुरावा अशा अधिकारक्षेत्रातून कंपनीद्वारे करण्यात येणार आहे.

अधिकारक्षेत्राचे मूल्यमापन हे वार्षिक आधारावर भौतिक सहाय्यक कंपन्यांच्या निर्धारणासाठीच्या मूल्यमापनाचा आधारावर करण्यात येणार आहे.

***